# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:06.09.2025** **वार:शनिवार**

1. शिक्षकांच्या योगदानामुळे भारत जागतिक महासत्ता होईल-राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचा विश्वास; राज्यातील सहा शिक्षक राष्ट्रीय पुरस्कारानं सन्मानित
2. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांचा शपथविधी
3. राज्यात अतिवृष्टीमुळे साडेचौदा लाख हेक्टर क्षेत्रावरच्या पिकांचं नुकसान; शेतकऱ्यांना योग्य ती मदत तातडीनं देण्यात येईल- कृषीमंत्र्यांची ग्वाही आणि
4. गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची आज गणेश विसर्जनानं होणार सांगता; स्थानिक प्रशासन आणि पोलीस यंत्रणा सज्ज

**शिक्षक दिन-राष्ट्रपती**

ज्येष्ठ शिक्षणतज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉक्टर सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती काल देशभरात शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. नवी दिल्लीतल्या विज्ञान भवन इथं आयोजित समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते 45 शालेय शिक्षक, 21 उच्च शिक्षण आणि 16 कौशल्य विकास क्षेत्रातील शिक्षकांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार प्रदान करण्यात आला. यात राज्यातल्या सहा शिक्षकांचा समावेश होता. मुंबईच्या सोनिया कपूर, नीलाक्षी जैन, लातूरचे डॉ. संदीपन जगदाळे, बारामतीचे डॉ. पुरुषोत्तम पवार, नागपूरचे अनिल जिभकाटे आणि नांदेडचे डॉ. शेख मोहम्मद वक़िउद्दीन शेख हमीदोद्दीन यांना काल सन्मानित करण्यात आलं. सर्व पुरस्कार प्राप्त शिक्षकांना प्रमाणपत्र, रौप्य पदक आणि 50 हजार रुपयांचं रोख बक्षीस प्रदान करण्यात आलं. यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान उपस्थित होते.

या समारंभात मार्गदर्शन करताना राष्ट्रपतींनी सावित्रीबाई फुले यांच्या योगदानाचा उल्लेख करत भारताला कौशल्याची राजधानी आणि जागतिक महासत्ता बनवण्यात शिक्षकांची भूमिका निर्णायक असल्याचं सांगितलं, या वेळी बोलताना राष्ट्रपती म्हणाल्या.....

**बच्चों की उड़ान को शक्ति देने में सबसे महत्वपूर्ण भूमिका, स्नेही और निष्ठावान शिक्षकों की होती है। शिक्षकों का आचरण, विद्यार्थियों का मार्गदर्शन करता है। प्राचीन काल में, जब भारत को विश्व-गुरु माना जाता था, तब के शिक्षा-संबंधी नैतिक आदर्श, आज के संदर्भ में भी, उतने ही उपयोगी हैं। Smart teachers का मतलब है, ऐसे teachers, जो अपने विद्यार्थियों के विकास से जुड़ी जरूरतों को समझते हैं।**

**राज्य शिक्षक दिन**

राज्यात विविध शाळा महाविद्यालयं आणि विद्यापीठांमध्ये काल शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. पुण्यात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्र-कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केलं. तर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने 23 शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलं.

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या वतीने 2022, 2023 आणि 2024 या वर्षातील जिल्हा शिक्षक पुरस्कारांचं वितरण विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते काल झालं. विकसित भारताची संकल्पना साकारण्यासाठी शिक्षकांनी ज्ञानदानातून सक्षम पिढी घडवावी, असं आवाहन राम शिंदे यांनी यावेळी केलं. जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील,

यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते. बुलडाणा जिल्ह्यातील चिखली तालुक्यातील शेलोडी गावात शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांचा आणि भारतीय सैन्य दलासह विविध क्षेत्रात कार्यरत माजी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

**<u>शपथ</u>**

मुंबई उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती म्हणून काल शपथ घेतली. राजभवनात झालेल्या एका छोटेखानी समारंभामध्ये राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी न्यायमूर्ती चंद्रशेखर यांना पदाची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्यासह इतर मंत्री, मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायाधीश आणि अधिकारी यावेळी उपस्थित होते. न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांनी यापूर्वी झारखंड उच्च न्यायालयाचे प्रभारी मुख्य न्यायाधीश म्हणूनही काम पाहिलं आहे.

**<u>अतिवृष्टी</u>**

गेल्या काही दिवसांत राज्यात झालेल्या अतिवृष्टीचा अनेक जिल्ह्यांना फटका बसला आहे. अतिवृष्टीमुळे राज्यातील 29 जिल्ह्यांतील 191 तालुक्यांमध्ये मोठं नुकसान झालं आहे. राज्यातलं 14 लाख 44 हजार 749 हेक्टर क्षेत्र बाधित झालं आहे. या बाधित भागात सुरू केलेलं पंचनाम्याचं काम अंतिम टप्यात असून शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात येईल, अशी ग्वाही कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. गेल्या महिन्यात झालेल्या पावसामुळे नांदेड, वाशीम, यवतमाळ, धाराशिव,बुलडाणा या जिल्ह्यांमध्ये पिकांचं मोठं नुकसान झालं आहे.

**<u>जीएसटी-अजित पवार</u>**

जीएसटी परिषदेने जीएसटी दर कपात आणि सुधारणांच्या केंद्र सरकारच्या प्रस्तावांना एकमताने संमती दिल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आनंद व्यक्त केला आहे. या निर्णयांबद्दल त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांचे आभार मानले आहेत. दैनंदिन जीवनावश्यक वस्तूंवरील कर कमी करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय स्वागतार्ह आहे. त्यामुळे सणासुदीच्या काळात जनतेला दिलासा मिळेल. या सुधारणांमुळे व्यापार सुलभ होईल, बाजारपेठेतील मागणी वाढेल आणि अर्थव्यवस्थेला नवी गती मिळेल. असा विश्वास अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

**<u>गणेश विसर्जन</u>**

राज्यात गेले दहा दिवस सुरू असलेल्या गणेशोत्सवाच्या मंगल पर्वाची सांगता आज गणेश विसर्जनानं होणार आहे. सार्वजनिक गणेश मंडळ तसंच घरगुती गणेश मुर्तींचं विसर्जन आज होणार आहे. यासाठी विविध शहरांत स्थानिक प्रशासनानं सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. हा उत्सव पर्यावरणपूरक पद्धतीनं राबवण्यासाठी कृत्रिम विसर्जन कुंड, निर्माल्य कुंडांची व्यवस्थाही करण्यात आली आहे. विसर्जन मिरवणूक सुरळीतपणे पार पाडण्यासाठी मुंबई पुण्यासह सर्वच शहरांमध्ये पोलीस यंत्रणा देखील सज्ज आहे.

नाशिकमध्ये गणेश विसर्जनाच्या मुख्य मिरवणुकीत 25 मंडळं सहभागी होणार असून सकाळी साडेदहा वाजता मिरवणूक सुरू होईल. मिरवणूक मार्गावर 83 सीसीटीव्ही लावण्यात आले आहेत. तसच आठ AI कॅमेऱ्याचा वापरही करण्यात येणार आहे. अकोल्यातील मोरणा घाटावर गणेश विसर्जनासाठी महानगरपालिकेने विशेष तयारी केली आहे. 7 विसर्जन कुंडाजवळ सुरक्षेची आणि स्वच्छतेची काटेकोर व्यवस्था करण्यात आली आहे. नंदुरबारमध्ये गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पोलीसांनी पन्नासहून अधिक सीसीटीव्ही कॅमेरे सज्ज ठेवले आहेत.

पुण्यातील वैभवशाली गणेश विसर्जन मिरवणूकीला थोड्याच वेळात सुरुवात होणार आहे. ऐकुया याबाबतचा एक वृत्तांत.....

**पुण्यात लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप देण्यासाठी सर्व मंडळांची तयारी पूर्ण झाली असून मानाच्या पाचही गणपतींसह शहरातील प्रमुख प्रतिष्ठित मंडळांच्या मिरवणुका भाविकांचे विशेष आकर्षण ठरणार आहेत. सकाळी साडेनऊ**

**वाजता मुख्य विसर्जन मिरवणुकीला सुरुवात होऊन ती लक्ष्मी रस्त्याने मार्गस्थ होईल. केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता, टिळक रस्ता, शास्त्री रस्ता आणि कर्वे रस्त्यावरून देखील विविध गणेश मंडळांच्या मिरवणुका मार्गस्थ होतील. गणेश विसर्जन मिरवणुकीसाठी पुणे पोलिस विभाग सज्ज झाला असून शहरात तब्बल आठ हजार पोलिस अधिकारी आणि कर्मचारी तैनात राहणार आहेत. प्रत्येक मंडळाला दोनच ढोल-ताशा पथकांना परवानगी देण्यात आली आहे. ध्वनीप्रदूषण टाळण्यासाठी सलग ढोलवादनास मनाई केली असून मिरवणुकीत लेझर दिव्यांनाही बंदी घालण्यात आली आहे. मात्र ध्वनिक्षेपकांचा वापर मध्यरात्रीपर्यंत करण्याची परवानगी दिली आहे. गेल्या वर्षी ही विसर्जन मिरवणूक 28 तास 45 मिनिटे चालली होती. आकाशवाणी बातम्यासाठी पुण्याहून सुहास देशपांडे.**

## सामाजिक उपक्रम

सार्वजनिक गणेशोत्सवाच्या अनुषंगानं राज्यात अनेक ठिकाणी गेले दहा दिवस विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कल्पनेतून राबवण्यात आलेल्या 'श्रीगणेशा आरोग्याचा' या विशेष उपक्रमाअंतर्गत राज्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये 28 ऑगस्ट ते 4 सप्टेंबर दरम्यान 7 हजार 159 आरोग्य शिबिरं घेण्यात आली. या शिबिरांतून 3 लाख 26 हजार नागरिकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली. या काळात 95 रक्तदान शिबिरांतून 6 हजार 862 रक्तदात्यांनी रक्तदान केलं. हिंगोलीच्या रिसाला बाजार भागातील विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने आरतीनंतर भाविकांना 15शे रोपांचा प्रसाद वाटप करून वृक्ष लागवडीचा संदेश देण्यात आला. अहिल्यानगरचं ग्रामदैवत श्रीविशाल गणेश मंदिरात गणेशोत्सवानिमित्त सामूहिक अथर्वशीर्ष पठण आणि महाआरती करण्यात आली. यामध्ये अनेक महिला सहभागी झाल्या होत्या.

## ईद

मुस्लिम धर्मियांचे प्रेषीत हजरत मोहम्मद पैगंबर यांची जयंती म्हणजेच ईद-ए-मिलादुन्नबी काल राज्यात साजरी करण्यात आली. दरवर्षी ईदच्या दिवशी विशेष मिरवणूक काढली जाते. परंतु यावर्षी पोलिस प्रशासनाच्या विनंतीवरून अनेक शहरांमध्ये ही मिरवणूक येत्या सोमवारी 8 सप्टेंबर रोजी काढण्यात येणार आहे. ईद-ए-मिलादनिमित्त काल राज्यात रक्तदान शिबीरांसारख्या सामाजिक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. हिंगोलीत मोफत आरोग्य शिबीर घेण्यात आलं.

## रोजगाराभिमुख प्रशिक्षण

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 17 सप्टेंबर रोजी 75 वा वाढदिवस आहे; हा दिवस अविस्मरणीय व्हावा यासाठी कौशल्य विभाग रोजगार आणि स्वयंरोजगार सेवा पंधरवडा साजरा करत आहे. या अनुषंगाने राज्यातल्या सुमारे 75 हजार युवक आणि युवतींना कौशल्यविषयक प्रशिक्षण दिलं जाणार असल्याची माहिती कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली आहे. येत्या 1 ऑक्टोबर रोजी राज्यातील 419 औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये या अभ्यासक्रमांचा प्रारंभ होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. रोबोटिक, सौर ऊर्जा तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्व आणि सामाजिक विकासासंदर्भातील अत्याधुनिक अभ्यासक्रम शिकवले जाणार आहेत.

## हवामान

मध्य महाराष्ट्राचा घाट प्रदेश आणि मराठवाड्यात जोराचे वारे आणि वीजांसह मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. उत्तर कोकणात मुसळधार पावसाची शक्यता आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.